रे.मु.नं.८१/१९८३.
नि.नं.२०५ लगत जोड.

--आदेश--

अर्ज वाचला. विधीज्ञांना ऐकले. प्रतिवादी क्र.१० हे दि.२८/७/१९९१ रोजी मयत आहेत. हा अर्ज १७ वर्षानी दाखल केला आहे. त्यांचे वारसांना या अर्जाची नोटीस प्राप्त होवुनही गैरहजर आहे. अबेटमेंट रद्द होणेसाठी, विलंब माफी साठी वेगवेगळे अर्ज दाखल नसले तरी त्याबद्दल अर्जात कारणे नमूद आहेत आणि ती संयुक्तीक व समाधानकारक आहेत. दावा धडेवाटप व कब्जा करीता आहे. प्रतिवादी क्र.१० चे पश्चात हा दावा त्यांचे वारसांविरुध्द पुढे चालू ठेवणेचा वादीला दि.प्र.सं.आदेश २२, नियम ४ अन्वये अधिकार आहे. सदर अर्ज मंजूर करणेत येतो. प्रतिवादी क्र.१० चे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येतो व अबेटमेंट रद्द करणेत येतो. सदरचे वारस अभिलखावर आणणेस परवानगी देणेत येते. त्याबद्दलची दुरुस्ती पुढील तारखेला वा त्यापुर्वी करावी व दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

दिनांक–२९/११/२०२२.

सही/–

(आर.आर.बेडगकर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी